महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/एडीएम/सुरक्षा ठेव रक्कम/२०२२/4176
दिनांक : 05 SEP 2022

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत/
खाजगी विनाअनुदानित संस्था

**विषय : - महाराष्ट्रातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत १८०० महाविद्यालयांकडे शिल्लक असलेली एकूण अनामत रक्कमेच्या ( Refundable Deposite) ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करणेबाबत...**

संदर्भ : - संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्रमांक
१) २अ/एडीएम/२०२२/१८२, दिनांक २६.०५.२०२२
२) २अ/एडीएम/२०२२/२३७, दिनांक ०८.०७.२०२२
३) २अ/एडीएम/२०२२/२९५, दिनांक ०१.०९.२०२२
४) तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. तंशिविकापु/विवि/सुरक्षा ठेव रक्कम/२०२२/३३१३ दिनांक १२.०७.२०२२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत, खाजगी विनाअनुदानित संस्थांच्या प्रमूखांना कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांनी परत न घेतलेल्या अनामत रकमेबाबत कोणती कार्यवाही करण्यात येते याची माहिती उपरोक्त संदर्भ क्र. ०४ अन्वये मागविण्यात आलेली होती, त्यास अनुसरुन वरील विषयाबाबतची माहिती अल्पशा संस्थांनी सादर केलेली आहे. त्यामुळे पुन:श्च एकदा संदर्भ क्रमांक ०३ नुसार सर्व संस्थाप्रमुख यांना सूचित करण्यात येते की, या पत्रासोबत दिलेल्या **गुगल फार्म लींक मध्ये** https://forms.gle/WCjdaMQ3NPErKhka7 आपल्या संस्थेची अचूक **माहिती दिनांक १९.०९.२०२२ रोजीपर्यंत सादर करण्यात यावी,** माहिती सादर न केलेल्या संस्थांवर नियमाप्रमाणे यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

सोबत : - संदर्भीय पत्र सोबत जोडले आहे.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : १. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४४७
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

दिनांक 1 SEP 2022

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/ २९५

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर

विषय : महाराष्ट्रातील सर्व शासकीय ,अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत १८०० महाविद्यालयांकडे शिल्लक असलेली एकूण अनामत रक्कमेच्या (Refundable Deposite) ३० टक्के रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करणेबाबत...

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक
१) २अ/एडीएम/२०२२/१८२, दिनांक २६.५.२०२२
२) २अ/एडीएम/२०२२/२३७, दिनांक ८.७.२०२२

महोदय,

वरील विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये श्री अमर जालिंदर एकाड,अध्यक्ष, कॉप्स विद्यार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २२.४.२०२२ रोजीचे निवेदन पाठविण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी परत न घेतलेल्या अनामत रकमेबाबत आपल्या अधिनस्त संस्थांकडून कोणती कार्यवाही करण्यात येते याची माहिती घेऊन सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने आपले अभिप्राय संचालनालयास त्वरीत सादर करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये कळविले होते. त्यास अनुसरून विभागांची माहिती सादर करण्यात आली . तथापि विभागातील सर्व संस्थांची माहिती सादर केलेली नाही. तरी सोबत दिलेल्या विहीत विवरणपत्रात आपल्या विभागाची माहिती Excel File तसेच PDF स्वरुपात दिनांक २१.९.२०२२ रोजीपर्यंत ई मेल द्वारा संचालनालयास सादर करण्यात यावी ही विनंती.

आपला,

( डॉ.गोविंद संगवई )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
02 SEP 2022
आवक क्र. ८९३२

E:\Budage\2022-23\General Correspondence\Caution money refundable deposit COPS demand.docx

तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांकडील अनामत रक्कमेबाबतची (Refundable Deposite) माहिती

| अ.क्र. | DTE Code | संस्थेचे नाव | मागील ५ वर्षात जमा झालेली अनामत रक्कम (रुपयांत) | | मागील ५ वर्षात विद्यार्थ्यांना परत करण्यात आलेली अनामत रक्कम (रुपयांत) | | मागील ५ वर्षात परत न करण्यात आलेली अनामत रक्कम (रुपयांत) | | मागील ५ वर्षात अनामत रक्कमेपैकी शासनाकडे जमा करण्यात आलेली (रुपयांत) | | दिनांक ३१.८.२०२२ रोजी संस्थेकडे असलेली एकूण शिल्लक रक्कम | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यार्थी संख्या | जमा रक्कम | विद्यार्थी संख्या | जमा रक्कम | विद्यार्थी संख्या | जमा रक्कम | विद्यार्थी संख्या | जमा रक्कम | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |